सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २५५ | रविवार, दि. ७ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४९६००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३८४००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११४०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २४९०/-
भाव प्रती १० ग्राम




# श्री विष्णू पंचायतन यागाने भाविकांमध्ये चैतन्य

## आज काल्याच्या कीर्तनाने होणार सांगता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील जागृत देवस्थान असलेल्या श्री मंगळग्रह मंदिरात सध्या 'पंचदिन साध्य विष्णू पंचायतन याग' मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात संपन्न होत आहे. या यागाचा आज चौथा दिवस असून, विविध धार्मिक विधी आणि मंत्रोच्चारांनी परिसर दुमदुमून गेला होता.

चतुर्थ दिवसाचे विशेष धार्मिक विधी यागाच्या चौथ्या दिवशी, ६ जून रोजी सकाळी सकल देवतांचे विधिवत प्रातः पूजन करण्यात आले. या दिवशी मुख्य यजमान म्हणून अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष तथा समाजकार्य फाउंडेशनचे डॉ. सुप्रिम पाटील यांनी आपल्या सहकुटुंबासह पूजा-अर्चा केली. त्यांच्यासोबत ॲड. प्रकाश आंधळे आणि दीपक हरी उगळे हे यजमान म्हणून उपस्थित होते.

विशेष पूजन आणि अभिषेक सूर्य पीठ व यंत्र देवता पूजन, सूर्य सूक्त आणि आदित्य हृदय स्तोत्राचे पठण करत सूर्य देवतेचा अभिषेक करण्यात आला.

होम-हवन बिलव फळ, बेलपान आणि तुपाच्या आहुती देऊन विशेष हवन करण्यात आले. नैवेद्य व आरती धूप, दीप, माध्यंदिन आरती, नैवेद्य आणि लाडूपूजन तसेच लाल फुलांचे अर्चन करून सर्व देवतांचे सायं पूजन करण्यात आले.



*अमळनेर : श्री विष्णू पंचायतन यागाच्या चतुर्थ दिवशी शनिवारी सपत्नीक हवन पूजन करताना मुख्य यजमान डॉ. सुप्रीम पाटील, ॲड. प्रकाश आंधळे व दीपक उगळे. शेजारी मंत्रोच्चार करताना मंदिराचे पुरोहित.* (छायाचित्र : मयूर चौधरी)

यागाच्या निमित्ताने आयोजित संगीतमय 'अधिकमास महात्म्य' कथा श्रवणाचा लाभ भाविकांनी घेतला. नाशिक येथील व्यास आचार्य श्री. वे. मू. हरिश कुलकर्णी गुरुजी यांनी आपल्या अमोघ वाणीतून अधिकमास महात्म्य कथा सांगितली. या कथा श्रवणामुळे उपस्थित भाविक भक्तीरसात न्हाऊन निघाले होते.

अधिकमासामध्ये भगवान विष्णू आणि माता महालक्ष्मी यांची कृपा प्राप्त करण्यासाठी, तसेच नवग्रहांच्या शांतीसाठी हा याग अत्यंत फलदायी मानला जातो. या धार्मिक अनुष्ठानमुळे घरामध्ये सुख-शांती लाभते आणि विविध ग्रहदोष निवारण होण्यास मदत होते, अशी भक्तांची गाढ श्रद्धा आहे.या कार्यक्रमासाठी मंगळग्रह सेवा संस्थेचे गुरुजी चंद्रकांत जोशी, मंदिराचे पुरोहित शुभम वैष्णव यांनी मुख्य पौरोहित्य केले. त्यांना पुरोहित प्रसाद भंडारी, परशुराम शर्मा, यश जोशी, गणेश जोशी, वैभव लोकांक्षी, तुषार दिक्षीत, जयेंद्र वैद्य, हेमंत गोसावी, उमेश पाठक यांनी सहकार्य केले. यावेळी मंगल सेवेकरी आणि परिसरातील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. उद्या, ७ जून रोजी या पाच दिवसीय यागाची सांगता होणार आहे.

### ह.भ.प.डॉ.सुप्रीम महाराज करणार काल्याचे कीर्तन



रविवार, दि. ७ जून रोजी सायंकाळी ६.३० ते रात्री ८.३० दरम्यान श्री मंगळग्रह मंदिर परिसरात कीर्तनकार ह.भ.प.डॉ.सुप्रीम महाराज कोंढावळकर काल्याचे कीर्तन करणार आहेत. याचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# 'मिड-सीझन ट्रिगर्स' पूर्ववत करा!

## शेतकरी संकटात असताना किसान कॉंग्रेस आक्रमक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रधानमंत्री पीक विमा योजनेत पूर्वीप्रमाणे 'मध्यहंगामी प्रतिकूल परिस्थिती ट्रिगर्स' (मिड-सीझन ट्रिगर्स) ही महत्त्वाची तरतूद तातडीने पूर्ववत लागू करण्यात यावी, अशी मागणी किसान कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांकडे करण्यात आली. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी सध्या अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव आणि हवामानातील अनिश्चित बदलांमुळे गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री पीक विमा योजना अपेक्षित दिलासा देण्यात अपयशी ठरत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.



*अमळनेर : प्रा. सुभाष पाटील यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी प्रतिनिधी यांना निवेदन देताना सुरेश पिरन पाटील, दिनेश पवार, शाम पवार, धनगर दला पाटील, गोकुळ बोरसे, प्रताप पाटील, श्रीराम पाटील, ताराचंद सूर्यवंशी, रोहिदास पाटील, सईद तेली, गिरीष पाटील आदी*

मागील वर्षापासून पीक विमा योजनेतील बदलांमुळे 'मिड-सीझन ट्रिगर्स' ही महत्त्वाची तरतूद वगळण्यात आली आहे. त्यामुळे नुकसान भरपाईची प्रक्रिया केवळ पीक कापणी प्रयोगांवर आधारित राहिली आहे. पूर्वी ही तरतूद अस्तित्वात असताना अतिवृष्टी, पावसाचा खंड, कीड-रोगांचा प्रादुर्भाव यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळत होती. मात्र, ही सुविधा बंद झाल्याने विमा हप्ता भरूनही अनेक शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

उत्तर महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि रोगराईमुळे पिकांच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. प्रत्यक्ष नुकसान झालेले असतानाही केवळ पीक कापणी प्रयोगांच्या निकषांमुळे अनेक शेतकरी भरपाईसाठी पात्र ठरत नसल्याची वस्तुस्थिती निवेदनातून मांडण्यात आली. मागील दोन वर्षांत हजारो कोटी रुपयांचे नुकसान होऊनही अनेक शेतकऱ्यांना अत्यल्प किंवा शून्य नुकसान भरपाई मिळाल्याच्या तक्रारी असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. विमा हप्ता भरूनही लाभ मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा पीक विमा योजनेवरील विश्वास कमी होत असून भविष्यात योजनेचा मूळ उद्देशच निष्फळ ठरण्याची भीती व्यक्त करण्यात आली. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळण्यासाठी 'मध्यहंगामी प्रतिकूल परिस्थिती ट्रिगर्स' ही तरतूद त्वरित पूर्ववत लागू करावी, तसेच उत्तर महाराष्ट्रातील सद्यस्थितीचा विशेष अहवाल सादर करून आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. यावेळी किसान कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश पिरन पाटील, तालुकाध्यक्ष दिनेश पवार, शाम पवार, धनगर दला पाटील, गोकुळ बोरसे, प्रताप पाटील, श्रीराम पाटील, ताराचंद सूर्यवंशी, रोहिदास पाटील, सईद तेली, गिरीष पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालिका कर्मचाऱ्याला ९५ हजारांचा गंडा; खात्यातून परस्पर रक्कम लंपास

## सायबर चोरट्यांचा प्रताप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नगरपरिषदेत कार्यरत असलेल्या योगेश आधार पवार (वय ३२, रा. ताडेपुरा, अमळनेर) यांच्या आयडीबीआय बँक खात्यातून दिनांक ५ जून २०२६ रोजी सकाळी ११.३८ वाजता सायबर गुन्हेगारांनी कोणताही ओटीपी किंवा बँकेचा कॉल न येता दोन टप्प्यांत ९४ हजार ९९९ रुपये ९७ पैसे काढून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

**कशी झाली फसवणूक?**


पवार यांच्या आयडीबीआय बँक खात्यातून पहिल्या व्यवहारात ५०,००० रुपये तर दुसऱ्या व्यवहारात ४४,९९९.९७ रुपये असे एकूण ९४,९९९.९७ रुपये कंभपती रमेश व अभिषेक नायक या व्यक्तींच्या नावे पाठवण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान पवार यांच्या मोबाइलवर कोणताही ओटीपी आला नाही, तसेच बँकेकडून कोणताही पुष्टीकरण कॉल देखील आला नाही. केवळ पैसे कपात झाल्याचे मॅसेज पाहिल्यानंतर त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

**मित्रांनी तात्काळ सायबर पोर्टलवर केली तक्रार**

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पवार यांनी त्वरित आपले मित्र गौतम बिऱ्हाडे, सतीश बिऱ्हाडे आणि अनंत संदानशिव यांना याबाबत सांगितले. यातील अनंत संदानशिव यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ सायबर क्राइमच्या राष्ट्रीय पोर्टलवर (www.cybercrime.gov.in) जाऊन ऑनलाइन तक्रार दाखल केली. त्यांनी व्यवहाराची वेळ, रक्कम, बँकेचा तपशील आदी माहिती पोर्टलवर नोंदविली. यामुळे पुढील तपासाला गती मिळण्याची शक्यता आहे. या घटनेची माहिती मिळताच अमळनेर पोलीस ठाण्याचे राहुल चव्हाण यांनीही तापसला सुरुवात केली आहे. , आयडीबीआय बँकेला व्यवहार तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सायबर तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारची फसवणूक 'सिम क्लोनिंग', 'मोबाइल हॅकिंग' किंवा 'प्री-अप्रूव्ड ट्रांझॅक्शन'द्वारे होऊ शकते. तसेच, कोणताही ओटीपी न आल्याने बँकेच्या व्यवस्थेतही गंभीर त्रुटी असल्याचे संकेत मिळतात.

# जीवघेण्या अपघातांना जबाबदार कोण?

## रस्त्यावर पसरलेल्या वाळूमुळे गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता



*अमळनेर : शहरातील बोरी नदी पुलावरील गतिरोधकाजवळ अपघातांना आमंत्रण देणारी पसरलेली वाळू.* (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

### शहरातील रस्त्यावर अनेक ठिक-ठिकाणी वाळू...

शहरातून सुरू असलेली वाळू वाहतूक काही दिवसांपूर्वी थांबली असली, तरी तिचे परिणाम अद्यापही नागरिकांना भोगावे लागत आहेत. अवजड डंपरच्या वाहतुकीमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली असून अनेक ठिकाणी वाहनांमधून गळालेली वाळू रस्त्यावर साचून राहिली आहे.विशेषतः मंगळग्रह मंदिर ते आर. के. नगर मार्गे मंगरूळकडे जाणाऱ्या महामार्गावरील अनेक गतिरोधकांजवळ वाळूचे थर अजूनही दिसून येत आहेत. त्यामुळे दुचाकीस्वारांचे चाक घसरून किरकोळ तसेच गंभीर अपघातांची मालिका सुरूच आहे. अनेक नागरिक जखमी झाले असून संबंधित विभागाने तातडीने याची दखल घेण्याची मागणी होत आहे.नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा कोणतीही बाब महत्त्वाची नसल्याने शहरातील सर्व धोकादायक ठिकाणांवरील वाळू त्वरित हटवून रस्ते सुरक्षित करावेत, अन्यथा आणखी गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : स्टेशन ते कचेरी रोडवरील रस्त्यावर साचलेली माती अखेर हटविण्यात आली असली, तरी अपघातांचे मुख्य कारण ठरत असलेली वाळू मात्र रस्त्यावर तशीच पडून असल्याने आणखी एक गंभीर अपघात घडला.

रस्त्यावर साचलेल्या वाळूमुळे दुचाकी घसरून पती-पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असून नागरिकांमधून प्रशासनाच्या निष्काळजीपणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित दाम्पत्य दुचाकीने जात असताना रस्त्यावर पडलेल्या वाळूमुळे वाहनाचे चाक अचानक घसरले.

दुचाकीवरील ताबा सुटल्याने दोघेही रस्त्यावर फेकले गेले. या अपघातात महिलेला डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. काही काळ त्या बेशुद्ध अवस्थेत होत्या. तसेच शरीराच्या विविध भागांनाही गंभीर मार लागला आहे.महिलेच्या पतीलाही हात, पाय, गुडघा व अंगठ्याला दुखापत झाली. अपघातानंतर काही काळ दोघांनाही हालचाल करणे शक्य नव्हते.

परिसरातील नागरिकांनी तत्परता दाखवत जखमी दाम्पत्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर नागरिकांनी संताप व्यक्त करत वारंवार अपघात होऊनही संबंधित यंत्रणा ठोस उपाययोजना का करत नाहीत, असा सवाल उपस्थित केला आहे. विशेष म्हणजे अपघात घडल्यानंतर काही वेळाने त्या ठिकाणी सफाई करून वाळू हटविली मात्र ती झाडून जागीच लावली गेली अजून ती पुन्हा पसरू शकते. यावर ठोस उपायोजना हवी अशी मागणी तेथील नागरिकांची आहे.

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!
स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!



## संपादकीय

# मूल्य नाही; मान तरी!

अवघ्या पाच महिन्यांनी, ८ नोव्हेंबर २०२६ या दिवशी अर्थक्रांतीच्या शालेय बुद्धिमत्तेचे दर्शन घडवणाऱ्या निश्चलनीकरणाचा दशकपूर्ती दिन. एरवी उत्सवांसाठी असे काही 'दिन' शोधत असणाऱ्या सत्ताधाऱ्यांकडून हा दशकपूर्ती सोहळा साजरा केला जाईल किंवा कसे याचे औत्सुक्य समस्त विकासेच्छू भारतीयांस निश्चितच असेल. कारण दहा वर्षांपूर्वी २०१६ साली या दिवशी साक्षात पंतप्रधानांनी 'सव्वासो क्रोर' देशवासीयांसमोर काळ्या पैशाच्या निर्मूलनार्थ पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटा यापुढे 'कागज के टुकडे' होणार असल्याचे शुभवर्तमान सुहास्यवदने सादर केले.नंतर काही तासांत 'पेटीएम'ने पंतप्रधानांचे आभार मानत असल्याच्या जाहिराती सर्वदूर प्रसृत केल्या आणि ही डिजिटल इंडियाच्या भरारीची आणि त्याचमुळे कागदी नोटांच्या अंताची सुरुवात असल्याचे आपणास सांगितले गेले. त्यापुढच्या काळात काळा पैसा कायमचा अंतर्धान पावता पावता कागदी चलनी नोटा हद्दपार होणार, सीमेपलीकडून बनावट नोटांचा पुरवठा आटणार, परिणामी काश्मिरातील हिंसाचार संपणार असे बरेच काही होणार असल्याची द्वाही फिरवली गेली. त्यानंतरच्या काळात काय काय झाले ते भारतीयांनी अनुभवले. त्याच्या उजळणीची आणि याही मुद्द्यावर 'लोकसत्ता'चे भाष्य किती अचूक ठरले याच्या पुनरुक्तीची अजिबात गरज नाही. त्यातच, गेली काही वर्षे सरासरी १५ टक्के इतक्या मोठ्या गतीने रोख रकमेचा सुळसुळाट वाढत चालल्याचे प्रतिपादन चलन व्यवहारावर नियंत्रण असलेली रिझर्व्ह बँक करत असेल तर त्या द्रष्ट्या निर्णयाच्या यशापयशाची वेगळी चिकित्सा करण्याचे कारण नाही. तथापि नव्याने या विषयास स्पर्श करण्याचे कारण म्हणजे रिझर्व्ह बँकेचा ताजा निर्णय.तो आहे यापुढे कागदाऐवजी प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याचा. कागदी नोटा लवकर खराब होतात आणि त्यांच्या निर्मितीचा खर्चही अधिक आहे असे कारण रिझर्व्ह बँक या संदर्भात देते. ते खरे असेलही. त्याच वेळी देशातील एक बडा सरकारस्नेही 'अ'द्योगपती प्लास्टिक नोटांसाठी आवश्यक रसायनांच्या उत्पादनात प्रवेश करत असल्याचे आरोप काहींकडून होतात. तेही खरे असतील.

रिझर्व्ह बँकेस प्लास्टिक नोटांची गरज वाटणे आणि या 'अ'द्योगपतीच्या संभाव्य प्लास्टिक रसायनांस गि–हाईक हवे असणे हे दोनही मुद्दे एकाच वेळी तितकेच सत्य असू शकतात. तशीही भारतीयांस गेल्या दहा वर्षांत अशा योगायोगांची सवय आहेच. (पाहा : सौर ऊर्जेवर केंद्राचा धोरणात्मक भर आणि त्याच वेळी काही 'अ'द्योगपतींचे या क्षेत्रात पदार्पण इत्यादी) तेव्हा हे दोनही खरे असले वा नसले तरी रिझर्व्ह बँकेकडून जो काही तपशील प्रसृत झाला त्यावरून एक बाब मात्र निश्चित निर्विवाद खरी असल्याचे स्पष्ट दिसते. ती म्हणजे नोटा वापरणाऱ्यांच्या संख्येत होत असलेली लक्षणीय वाढ. आणि त्याबरोबर नोटा छापण्याच्या खर्चात झालेली वाढ. रिझर्व्ह बँकेच्या अहवालातच याबाबतचा तपशील असून तो थक्क करणारा आहे.रिझर्व्ह बँकेने गेल्या वर्षी केवळ नोटा छापण्यावर सुमारे पाच हजार कोटी रु. खर्च केले. तर यंदा हाच खर्च ६,३७८ कोटी इतका झाला. गेल्या वर्षी खराब झालेल्या, फाटलेल्या इत्यादी २३०० कोटी नोटा देशभर बँकेत जमा झाल्या. त्याआधीच्या वर्षात हीच संख्या २१०० कोटी इतकी होती. यातही हास्यास्पद वाटेल अशी बाब म्हणजे बँकेत बदलीसाठी आलेल्या बहुतांश नोटा या नव्या, २०१६ सालातील निश्चलनीकरणानंतर प्रसृत झालेल्या आहेत. यावरून या नोटांच्या छपाईचा, कागदाचा दर्जा काय हे ध्यानात यावे. या सर्व तपशिलाचा अर्थ एकच. आपल्या देशात रोखीचे व्यवहार कमी होण्याचे काही नाव नाही. हे प्रमाण दरवर्षी ११.५ टक्यांनी वाढते असून १५ मे या एकाच दिवशी चलनात असलेल्या नोटांचे एकत्रित मूल्य ४२ लाख ८६ हजार कोटी रु. इतके आहे. यातील खरा धक्का हा की दहा वर्षांपूर्वी जेव्हा निश्चलनीकरण जाहीर झाले तेव्हा चलनातील रोख रकमेचे मूल्य फक्त १७ लाख ९७हजार कोटी रु. इतके होते. आता ते जवळपास ४३ लाख रु. इतके आहे. म्हणजे गेल्या दहा वर्षांत चलनातील रोख रकमेचे प्रमाण जवळपास अडीच पटींनी वाढले. गेल्या एका वर्षापुरती ही झालेली 'चलनवाढ' एक लाख १५ हजार कोटी रुपयांची आहे. आपल्याकडे भाजीवालाही डिजिटल पेमेंट स्वीकारतो इत्यादी कौतुक नेहमी सांगितले जाते. ते ठीक. पण त्यामुळे रोख रकमेच्या गरजांत तसूभरही फरक पडलेला नसून उलट दहा वा वीस रुपयांच्या नोटांच्या मागणीत गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढच होत असल्याचे दिसते. गेली काही वर्षे नोटांऐवजी नाणी लोकप्रिय करण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँकेने करून पाहिला. अगदी वीस रुपयांचीही नाणी बँकेने प्रसृत केली. हे नाणे इतक्या रकमेचे आहे हेच कळत नाही, अशी भले नागरिकांची तक्रार असेल. पण बँकेने प्रयत्न केला. गेल्या वर्षी विविध मूल्यांची १५० कोटी नाणी बँकेने चलनात आणली. त्यात ८० कोटी नाणी ही पाच रुपयांची आहेत आणि ४० कोटी २० रु. मूल्याची. या सर्व खर्चाचा मोबदला तितक्या प्रमाणात मिळत नाही असे बँकेस वाटते.म्हणून मग आता प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याची टूम. विकसित जगातील इंग्लंड, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया आदी देशांत अशा नोटा चलनात आहेत. या लवकर खराब होत नाहीत, हे उघड आहे. विशेषत: पाऊसपाण्यात नोटा भिजणे हे आपल्याकडील मोठे संकट. प्लास्टिकच्या नोटांमुळे त्यावर सहज मात करता येईल. दुसरे असे की अन्य अनेक प्लास्टिक चिजांप्रमाणे या नोटांस दीर्घायुष्य लाभते. एकदा छापल्या की वर्षानुवर्षे या नोटा 'चालतात'. तथापि प्लास्टिक म्हटले की पर्यावरण दुष्टतेचा आरोप ओघाने आलाच.

प्लास्टिकच्या नोटा यास अपवाद ठरतात. याचे कारण खराब झालेल्या नोटांचा पुनर्वापर करता येणे तंत्रदृष्ट्या शक्य होते. म्हणजे नोटा देऊन पुन्हा नोटा छापता येतात. तसेच या नोटा 'एटीएम' स्नेही देखील असतात. निश्चलनीकरणानंतर नव्या नोटा प्रसृत करताना आपल्याकडे नव्या नोटांचा आकार बदलण्याचा निश्चलीकरणाइतकाच अनाकलनीय निर्णय घेतला गेला. परिणामी बँकांस हजारो कोटींचा भुर्दंड केवळ नव्या नोटांच्या आकाराप्रमाणे एटीएम यंत्रांची फेररचना करण्यासाठी पडला. आता तसे होणार नाही, असे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे. रिझर्व्ह बँकेची व्याजदराबाबतची तिमाही बैठक येत्या आठवड्यातच भरेल. आखाती युद्ध, त्याचा अर्थव्यवस्थेस बसलेला फटका इत्यादी कारणांमुळे आणि मुख्य म्हणजे खनिज तेलाचे दर वाढल्यामुळे अर्थव्यवस्थेसमोर चलनवाढीचा धोका संभवतो. अशा वेळी व्याजाचे दर वाढवणे हा जालीम इलाज. पण तसे केल्याने सरकार दुखावते. कारण कर्जे, पतपुरवठा महाग होतो आणि वाढीचा वेग अधिकच मंदावतो. तेव्हा रिझर्व्ह बँकेच्या विद्यमान नेतृत्वाचा चेहरामोहरा लक्षात घेतल्यास व्याजदर वाढवला जाण्याची शक्यता तशी कमीच. बँक व्याजदराबाबत 'जैसे थे' धोरण अंगीकारेल, हीच शक्यता अधिक. तेव्हा नोटांच्या दरांबाबत काही निर्णय होवो वा न होवो. त्यांच्या रंगरूपाबाबत मात्र लवकरच निर्णय होईल असे दिसते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर रुपयाचे मूल्य वाढणार नाही, हे खरे. पण हा कागज का टुकडा प्लास्टिकचा झाला की निदान त्याचा मान तरी वाढेल, ही आशा.

# पालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे झामी चौक दहा दिवस तहानलेलाच!

## नागरिकांच्या आक्रमक भूमिकेनंतर केला पाणीपुरवठा सुरळीत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील झामी चौक परिसरात नगर परिषदेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेतील हलगर्जीपणाचा फटका नागरिकांना बसला असून तब्बल दहा दिवस परिसरातील नागरिक पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहिल्याची घटना समोर आली आहे. मुख्य व्हॉल माती व वाळूने बुजल्याने पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला होता. मात्र प्रशासनाकडून वेळेत दखल न घेतल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



*अमळनेर : शहरातील झामी चौक परिसरात विक्रांत पाटील, जितेंद्र ठाकूर, प्रकाश महाजन कामाचा आढावा घेताना*

याबाबत अधिक माहितीनुसार, झामी चौक येथील नव्याने बांधण्यात येत असलेल्या पाण्याच्या टाकीजवळील मुख्य व्हॉल ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांकडून वाळू व माती टाकून झाकला गेला होता. त्यामुळे संपूर्ण परिसरातील पाणीपुरवठा बंद झाला. समस्या गंभीर असतानाही संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना केल्या नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने अखेर स्थानिक नागरिकांनी स्वतः पुढाकार घेतला. शेतकी संघाचे संचालक विक्रांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली जितेंद्र ठाकूर, प्रकाश महाजन, कैलास महाजन, अशोक पाटील, हितेश बडगुजर, अशोक नेवे, शुभम शिंपी, परेश उदेवाल आणि राजेंद्र पाटील यांनी घटनास्थळी जाऊन कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आवश्यक काम करून घेतले. यावेळी नगर परिषद कर्मचारी विजय विसावे यांनीही तात्काळ हस्तक्षेप करून मुख्य व्हॉल मोकळा करून घेतला. नागरिकांच्या या प्रयत्नांमुळेच तब्बल अकरा ते बारा दिवसांनंतर परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत होण्याचा मार्ग मोकळा झाला. अन्यथा नागरिकांना आणखी काही दिवस पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागले असते. दरम्यान, या घटनेनंतर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात असून संबंधित ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. पाणीपुरवठ्यासारख्या मूलभूत सुविधेकडे दुर्लक्ष झाल्याने नगर परिषद प्रशासनाचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा समोर आल्याची चर्चा शहरात सुरू आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पाणीपुरवठा यंत्रणेची नियमित तपासणी, कामांवर प्रभावी देखरेख आणि तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# शासकीय फसवणुकीचा मोठा पर्दाफाश!

## बनावट प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्यांवर गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बनावट प्रतिज्ञापत्र तयार करून ते खरे असल्याचे भासवत शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी अमळनेर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई तहसील कार्यालयातील चौकशीनंतर करण्यात आली.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तहसील कार्यालयातील अव्वल कारकून अनिल दगडू परदेशी (वय ५८, रा. सध्या नाशिक) यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यानुसार विरेंद्र राजेंद्र सोनवणे (रा. गंगापुरी, ता. धरणगाव), कविता पंडित भिल (रा. सत्रासेन, ता. चोपडा) आणि रविंद्र जगन्नाथ जोशी (रा. अमळगाव, ता. अमळनेर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३४२ व ३१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादीनुसार, १२ जून २०२५ रोजी संबंधित आरोपी अंतुर्लीकर विवाह मंडळ, अमळनेर येथील विवाहाची सत्यता प्रमाणित करण्यासाठी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र व ई–सेवा केंद्रातून नोंदणीकृत ऑनलाईन प्रतिज्ञापत्र घेऊन तहसील कार्यालयात आले होते. त्यावेळी कार्यकारी दंडाधिकारी म्हणून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून ते प्रमाणित करण्यात आले होते.

दरम्यान, २० एप्रिल २०२६ रोजी या प्रकरणी बेकायदेशीररीत्या तयार करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राबाबत तक्रार प्राप्त झाली. त्यानंतर तहसीलदारांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार ए. पी. कुलकर्णी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. चौकशीदरम्यान संबंधितांना मूळ प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी वारंवार नोटीस देण्यात आली. मात्र, आरोपींनी मूळ कागदपत्र सादर केले नाही तसेच चौकशीस अपेक्षित सहकार्यही केले नाही.

चौकशीत संबंधितांनी बनावट दस्तऐवज तयार करून तो मूळ असल्याचे भासवल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशान्वये गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार अमळनेर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ चंद्रकांत पाटील करीत आहेत. गुन्हा दाखल अंमलदार म्हणून पोहेकॉ विनोद भोई यांनी कार्यवाही केली.

# रेल्वे स्टेशन परिसरात वृक्षारोपण

## रोटरी क्लब अमळनेर, महिला हाऊसिंग ट्रस्ट व रेल्वे प्रशासनाचा संयुक्त उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रोटरी क्लब अमळनेर, महिला हाऊसिंग ट्रस्ट व अमळनेर रेल्वे स्टेशन प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने अमळनेर रेल्वे स्टेशन परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटरी क्लबचे सचिव रो. आशिष चौधरी यांनी केले. यावेळी स्टेशन प्रबंधक अनिल बी. शिंदे, परिवहन निरीक्षक लालबाबू सिंग, वाणिज्य निरीक्षक रवी पांडे, निरीक्षक श्री. सत्यजित कुमार, स्वास्थ्य निरीक्षक सोनी सिंग, कार्यनिरीक्षक पंकज हाडेकर, कल्याण निरीक्षक अनिल पी. आर. तसेच रेल्वे प्रशासनातील विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वृक्षारोपण मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

गेल्या वर्षी पर्यावरण सखींच्या माध्यमातून संपूर्ण अमळनेर शहरात सुमारे १२ हजार वृक्षांची लागवड करून त्यांचे यशस्वी संगोपन करण्यात आले होते. यावर्षीही १२ ते १५ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, अमळनेर शहरातील विविध भागांमध्ये वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे. या प्रसंगी रोटरी क्लब अमळनेरचे अध्यक्ष रो. देवेंद्र कोठारी, सचिव रो. आशिष चौधरी, प्रकल्प प्रमुख रो. प्रीतपाल सिंग बग्गा, रो. विजय माहेश्वरी, रो. विजय पाटील, रो. अभिजीत भंडारकर, रो. महेश पाटील, रो. चेलाराम सैनानी, रो. ईश्वर सैनानी आदी सदस्य उपस्थित होते.

पर्यावरण संरक्षण व हरित अमळनेरच्या दिशेने राबविण्यात आलेला हा संयुक्त उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला असून, भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# 'प्लास्टिकला नकार, स्टीलला होकार': शाळांच्या सुरुवातीला पर्यावरणपूरक अभियानाचा एल्गार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शाळांची घंटा वाजली असून, विद्यार्थ्यांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचा उत्साह ओसंडून वाहत आहे. नवीन पुस्तके आणि शैक्षणिक साहित्याच्या खरेदीची लगबग सुरू असतानाच, यंदा पालक आणि विद्यार्थ्यांनी 'पर्यावरणपूरक शाळा' या संकल्पनेला प्राधान्य देत प्लास्टिकला फाटा देऊन 'स्टील'चा आग्रह धरण्याचे आवाहन केले आहे.




पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळणे ही काळाची गरज बनली आहे. प्लास्टिक बाटल्या आणि टिफिन डब्यांच्या अतिवापरामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान लक्षात घेता, या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांनी स्टीलच्या बाटल्या आणि टिफिन डब्यांचा वापर करण्याचा संकल्प केला आहे.

**आरोग्य आणि पर्यावरणाचे रक्षण**

तज्ज्ञांच्या मते, प्लास्टिकच्या बाटल्यांमधील पाणी दीर्घकाळ राहिल्यास त्यातून हानिकारक रसायने पाण्यात मिसळण्याची शक्यता असते. याउलट, स्टीलच्या भांड्यांचा वापर आरोग्यासाठी अधिक सुरक्षित आहे. स्टीलच्या वस्तू दीर्घकाळ टिकणाऱ्या आणि स्वच्छतेच्या दृष्टीने सुलभ असल्याने पालकांकडूनही या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे. 'प्लास्टिकमुक्त शाळा' या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच निसर्गाप्रती आदर आणि 'हरित जीवनशैली'ची सवय रुजण्यास मदत होणार आहे.

**एक छोटा बदल, मोठा परिणाम**

या उपक्रमात सहभागी झालेल्या पालकांनी सांगितले की, दरवर्षी आपण प्लास्टिकच्या वस्तू खरेदी करतो आणि त्या लवकर खराब होतात. स्टीलचा वापर केल्याने केवळ कचरा कमी होणार नाही, तर भविष्यातील पिढीला आपण एक स्वच्छ आणि सुरक्षित वसुंधरा देण्याचा प्रयत्न करत आहोत.

या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थी आता प्लास्टिकच्या बाटल्यांऐवजी चकाकणाऱ्या स्टीलच्या बाटल्या आणि टिफिन घेऊन शाळेत जाणार आहेत. प्लास्टिकला दिलेला हा नकार, पर्यावरणाच्या श्वासाला मोकळी वाट करून देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

# ज्याच्या हास्यावर जग फिदा झाले; तो अरुणकुमार कुठला?

## खरी कहाणी जाणून डोळे पाणावतील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोशल मीडियावर रोज असंख्य व्हिडिओ व्हायरल होत असतात. काही दिवस चर्चा होऊन ते विस्मरणातही जातात. मात्र काही चेहरे असे असतात की ते लोकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवून जातात. हातात चहाचा छोटासा कप, चेहऱ्यावर निरागस हास्य आणि डोळ्यांतून झळकणारा आनंद... अवघ्या १५ सेकंदांच्या व्हिडिओमुळे जगभर प्रसिद्ध झालेला अरुणकुमार हा असाच एक चेहरा आहे. इंटरनेटवरील लाखो लोक त्याला 'हसणारा मुलगा' म्हणून ओळखतात. मात्र त्याच्या हास्यामागे संघर्ष, गरिबी, शिक्षणासाठीची झुंज आणि एका गुरूने घडविलेली आयुष्य बदलणारी कहाणी दडलेली आहे.

तेलंगणातील एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या अरुणकुमारचे बालपण अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत गेले. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या कुटुंबात शिक्षण हा अनेकदा दुय्यम विषय ठरतो. अरुणच्या बाबतीतही तेच घडले. अवघ्या दहाव्या वर्षी चौथी इयत्तेत असतानाच त्याला शाळा सोडावी लागली. वर्गातील बाक, शाळेचे मैदान, मित्रांचा सहवास आणि शिक्षणाची स्वप्ने एका क्षणात मागे पडली. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काहीतरी काम शोधणे हीच त्याची प्राथमिकता बनली. लहान वयातच जबाबदारीच्या ओझ्याखाली दबलेल्या अरुणला नेहरू नावाच्या स्थानिक ट्रक चालकाने मदतीचा हात देत त्याला ट्रकवर क्लिनरचे काम दिले. ट्रकची साफसफाई, सामानाची देखरेख, चालकाला मदत करणे आणि दिवस–रात्र रस्त्यावर राहणे, हेच त्याचे आयुष्य बनले. त्यावेळी कदाचित त्यालाही कल्पना नव्हती की त्याच्या आयुष्यातील सर्वात मोठा बदल याच काळात घडणार आहे.

एकदा दुपारी नेहमीप्रमाणे चहा पिताना अरुण कुठल्या तरी विनोदावर खळखळून हसत होता. त्याच्या चेहऱ्यावरील आनंद इतका नैसर्गिक होता की ट्रक मालक नेहरू यांनी तो



क्षण मोबाईलमध्ये कैद केला. हा व्हिडिओ त्यांनी सोशल मीडियावर अपलोड केला आणि काही तासांतच तो इंटरनेटवर वाऱ्यासारखा पसरला. लाखो लोकांनी तो पाहिला, शेअर केला आणि त्या निरागस हास्यावर प्रेम व्यक्त केले. काही दिवसांतच अरुण जगभरातील सोशल मीडिया वापरकर्त्यांच्या ओळखीचा चेहरा बनला. कॉमेडी पोस्ट, मजेदार प्रसंग आणि मीम्समध्ये त्याचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर वापरला जाऊ लागला. जगभरातील लोकांना त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद आवडू लागला. मात्र या प्रसिद्धीच्या मागे एक कटू वास्तव लपलेले होते. ज्या मुलाच्या हास्याचे लाखो लोक कौतुक करत होते, त्यालाच स्वतःबद्दल लिहिलेल्या प्रतिक्रिया वाचता येत नव्हत्या. कारण शिक्षणापासून तो अनेक वर्षे दूर राहिला होता.

**रस्त्यांवर धावणारा ट्रक बनला शाळा**

इंटरनेटसाठी अरुणकुमार हा केवळ एक व्हायरल मीम होता. परंतु ट्रक मालक नेहरू यांच्यासाठी तो त्यापेक्षा खूप मोठा होता. नेहरू यांनी स्वतःही गरिबीमुळे शिक्षण अर्धवट सोडले होते. त्यामुळे अरुणचे भविष्यही त्याच अंधारात हरवू नये, अशी त्यांची मनापासून इच्छा होती. त्यांनी केवळ मालकाची भूमिका निभावली नाही, तर शिक्षक, मार्गदर्शक आणि पालकाची जबाबदारी स्वीकारली. अरुणला पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा त्यांनी निर्धार केला. पुस्तकांपासून ते परीक्षेच्या शुल्कापर्यंतचा सर्व खर्च त्यांनी उचलला. शासकीय प्रक्रिया पूर्ण करून अरुणला बाह्य विद्यार्थी म्हणून शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली. दिवसाचे काम संपल्यानंतर किंवा प्रवासादरम्यान ट्रकची केबिनच त्यांची वर्गखोली बनत असे. लांब पल्ल्याच्या प्रवासात नेहरू त्याला अक्षर ओळख शिकवत. गणिताची उदाहरणे सोडवत. वाचन आणि लेखनाचा सराव करून घेत. रस्त्यांवर धावणारा ट्रक एका अर्थाने फिरती शाळाच बनला होता. अनेक वर्षांचा शैक्षणिक खंड भरून काढणे हे सोपे काम नव्हते. पण अरुणने हार मानली नाही.

**इन्स्टाग्रामवर लाखो चाहते**

दरम्यान, अरुणकुमारची सोशल मीडियावरील लोकप्रियता वाढतच होती. इन्स्टाग्रामवर त्याचे लाखो चाहते तयार झाले. आज @mr_laddu_०००९ या खात्याला पाच लाखांपेक्षा अधिक फॉलोअर्स आहेत. मात्र प्रसिद्धीच्या झगमगाटापेक्षा शिक्षणाला महत्त्व देण्याचा त्याचा निर्णय अधिक महत्त्वाचा ठरला. अखेर अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर त्याने दहावीची परीक्षा दिली. निकालाचा दिवस त्याच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा क्षण ठरला. कारण त्याच्या नावासमोर 'उत्तीर्ण' हा शब्द झळकत होता. चौथीनंतर शिक्षण सोडलेल्या एका मुलासाठी हे यश असामान्य होते. त्याने केवळ परीक्षा पास केली नव्हती, तर परिस्थितीपुढे हार न मानण्याचा संदेश दिला होता. आज १८ वर्षीय अरुणकुमार हा फक्त एका व्हायरल व्हिडिओचा चेहरा राहिलेला नाही. तो संघर्षातून यश मिळविणाऱ्या तरुणांचे प्रतीक बनला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ‘पढ़ाई के लिए कहती थी सास, काम करने पर डांटते थे ससुर’

## समाज के लिए बड़ी सीख है जज बहू की कहानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘अगर ससुराल में भी बेटियों को भरोसा और साथ मिल जाए, तो बहू सिर्फ घर नहीं संभाल सकती, बल्कि सफलता की नई मिसाल कायम कर सकती है।’ जी हां, राजस्थान के बाड़मेर जिले की ‘जज बहू’ दीपू कंवर की सक्सेस स्टोरी इसका जीता-जागता उदाहरण हैं।

### घूंघट में चुपचाप पढ़ाई कर जज बनी बहू

क्या हो अगर कोई सास बहू को कहने लगे कि अपनी पढ़ाई पर ध्यान दो और ससुर घर के काम करने पर डांटने लगे? बहू पूरे देश में परिवार का नाम रोशन कर सकती है। राजस्थान के बाड़मेर जिले में, दीपू कंवर ने सालों तक अपने घूंघट के पीछे चुपचाप पढ़ाई की। आज, वह एक सिविल जज के तौर पर कोर्टरूम में कदम रख चुकी हैं।

### बीकॉम कर रही थीं, फिर पति के कहने पर की एलएलबी

दीपू कंवर बचपन से पढ़ाई, खेल-कूद में काफी अच्छी थीं। हमेशा उनके मन में एक बड़ा अफसर बनने की ख्वाहिश थी। उन्होंने बीकॉम भी किया है। दीपू कंवर कई इंटरव्यू में अपनी जर्नी के बारे में बात कर चुकी हैं। उन्होंने बताया है कि जब उनकी सगाई हुई, तब वे बीकॉम कर रही थीं। उनके पति लोकेंद्र सिंह भी एलएलबी की पढ़ाई कर रहे थे। उनके पति ने उन्हें एलएलबी करने के लिए प्रेरित किया। इसके बाद उन्होंने के.पी. शाह लॉ कॉलेज जामनगर में एडमिशन लिया और लॉ की पढ़ाई पूरी की।




### ससुराल में मिला पूरा सपोर्ट

दीपू कंवर कहती हैं कि आगे पढ़ाई करके कुछ बनना मेरे से ज्यादा ससुराल का ड्रीम बन गया। उन्होंने एक कमरे को स्टडी रूम बना लिया। वे पढ़ाई के साथ-साथ गाय का दूध निकालना, खाना बनाना और दूसरे घर के काम करती थीं। हालांकि उनके सास-ससुर ने पढ़ाई पर ध्यान देने के लिए बोलते थे।



### घर का काम करने पर डांटते थे ससुर

एक इंटरव्यू में दीपू कंवर ने अपने सुसरा के बारे में बात करते हुए बताया कि जब वे घर के काम करती थीं, तो ससुरजी डांटते थे। वे कहते थे कि घर के काम छोड़ो और पढ़ाई करके कुछ बनकर दिखा दो। पहले पढ़ाई करो, उसके बाद दूसरे काम। दीपू की एक बेटी भी है। वे बताती हैं कि जब भी वे कॉलेज की परीक्षाएं देने जामनगर जाती थी, तो उनकी बेटी राजस्थान में ही रहती थी। एलएलबी सेकेंड ईयर एग्जाम के समय सिर्फ आठ दिन ससुराल में रुकी थी। फिर वापस चली गई थी। लेकिन सब मेरे हिसाब से एडजस्ट हो रहा था। कहीं कोई दिक्कत नहीं आई।

### तीसरे प्रयास में जज बनीं

परिवार के सपोर्ट की वजह से जज बनने के सफर में बहुत कम रुकावटें आईं। एलएलबी करने के बाद उन्होंने जामनगर में ही कोर्ट में प्रैक्टिस करना शुरू कर दिया था। साल २०२२ में पहली बार गुजरात न्यायिक सेवा परीक्षा दी। प्रीलिम्स और मेन्स क्वालीफाई हो गया था, लेकिन इंटरव्यू में रह गईं।

इसके बाद २०२३ में मेन्स में निराशा हाथ लगी। फिर भी उन्होंने हिम्मत नहीं हारी और गुजरात राज्य न्यायिक सेवा परीक्षा की तैयारी जारी रखी। २०२५ में उनकी लगन आखिरकार रंग लाई। उन्होंने गुजरात स्टेट ज्यूडिशियल सर्विस परीक्षा पास कर ली और ७९वीं रैंक हासिल करके रेगिस्तान की बहू गुजरात में एक सिविल जज बन गई।

# जुन्या साड्या फेकू नका! बनवा डिझायनर पडदे

## घराला मिळेल एकदम नवा लुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घराच्या सजावटीमध्ये पडद्यांचा खूप मोठा वाटा असतो. सुंदर आणि स्टायलिश पडदे कोणत्याही खोलीचा लुक पूर्णपणे बदलू शकतात. पण बाजारात मिळणारे डिझायनर पडदे अनेकदा खूप महाग असतात. अशावेळी तुमच्या कपाटात जर जुन्या साड्या पडून असतील, तर त्या फेकून देण्याऐवजी तुम्ही त्यापासून शानदार पडदे बनवू शकता. यात सगळ्यात चांगली गोष्ट म्हणजे यामुळे तुमच्या घराला एक वेगळा आणि रॉयल लुक तर मिळतोच, पण त्याचबरोबर अगदी कमी खर्चात घराची सजावटही होते.



### रेशमी साड्यांमधून द्या रॉयल टच

तुमच्याकडे एखादी जुनी रेशमी किंवा बनारसी साडी असेल, तर त्यापासून खूप सुंदर पडदे बनवता येतात. या साड्यांचं कापड आणि त्यावरील बारीक डिझाइन खोलीला एक क्लासी आणि आकर्षक लुक देतं. असे पडदे लावल्यामुळे, विशेषतः लिव्हिंग रूम किंवा गेस्ट रूममध्ये एक शाही वातावरण तयार होतं. सोनेरी काठ असलेल्या साड्यांपासून बनवलेले पडदे तर दिसायला खूपच महागडे आणि शानदार वाटतात.

### सुती साड्यांमधून मिळवा शांत आणि सुखद लुक

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये सुती साड्यांपासून बनवलेले पडदे एक उत्तम पर्याय आहेत. हे पडदे वजनाला हलके असल्यामुळे खोलीत हवा खेळती राहते आणि नैसर्गिक प्रकाशाचा योग्य बॅलन्स राखला जातो. फुलांची प्रिंट किंवा हँडलूमच्या साड्यांपासून बनवलेले पडदे तुमच्या घराला एक फ्रेश आणि पारंपरिक लुक देतात. हे पडदे बेडरूम किंवा बाल्कनीमध्ये लावण्यासाठी अगदी योग्य आहेत.

### पॅचवर्क डिझाईनने वाढवा शोभा

जर एका साडीतून पूर्ण पडदा तयार होत नसेल, तर तुम्ही दोन किंवा तीन जुन्या साड्या एकत्र करून एक पॅचवर्क डिझाईन तयार करू शकता. वेगवेगळ्या रंगांचा आणि प्रिंट्सचा मेळ तुमच्या घराला एक ट्रेंडी आणि क्रिएटिव्ह लुक देईल. ज्यांना आपल्या घराला खरंच काहीतरी हटके लुक द्यायचा आहे, त्यांच्यासाठी ही पद्धत विशेषतः चांगली आहे. थोडी कल्पकता वापरून तुम्ही तुमच्या जुन्या कपड्यांना घराच्या सजावटीच्या शानदार वस्तूंमध्ये बदलू शकता.

### लेस आणि लटकन लावून द्या आधुनिक टच

तुम्ही फक्त साडीचा वापर करण्यापुरते मर्यादित राहण्याची गरज नाही. तुम्ही लेस, लटकन किंवा मणी लावून पडद्यांना आणखी स्टायलिश बनवू शकता. बाजारात सहज मिळणारी डिझायनर लेस तुमच्या पडद्यांचं सौंदर्य अनेक पटींनी वाढवू शकते. जर तुम्हाला आधुनिक आणि सणासुदीचा लुक हवा असेल, तर पडद्यांच्या कडेला छोटे-छोटे लटकन लावणे ही सुद्धा एक उत्तम कल्पना आहे.

### पडदे बनवणे आहे अगदी सोपे

जुन्या साड्यांपासून पडदे बनविणे खूप सोपे आहे. सर्वांत आधी, साडी स्वच्छ धुऊन घ्या आणि तिला व्यवस्थित इस्त्री करून घ्या. त्यानंतर तुमच्या खिडकी किंवा दाराच्या आकारानुसार आवश्यक लांबी मोजा आणि गरजेनुसार कापड कापून घ्या. पडदा रॉडमध्ये घालण्यासाठी वरच्या बाजूला एक घडी घालून ती पक्की शिवून घ्या. तुमची इच्छा असेल, तर तुम्ही खालच्या बाजूला एक डिझायनर बॉर्डरही लावू शकता. फक्त थोड्याशा मेहनतीने तुमच्या घरासाठी सुंदर पडदे तयार होतील.

### कमी बजेटमध्ये डिझायनर होम डेकोर

आजकाल डीआयवाय होम डेकोरचा ट्रेंड खूप वाढला आहे आणि जुन्या साड्यांपासून बनवलेले पडदे या ट्रेंडचा एक महत्त्वाचा भाग आहेत. यामुळे केवळ पैशांची बचत होत नाही, तर तुमच्या घराला एक वैयक्तिक आणि क्रिएटिव्ह टचही मिळतो. पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही तुमचं कपाट साफ कराल, तेव्हा तुमच्या जुन्या साड्या फेकून देण्याऐवजी त्यांचा अशाप्रकारे पुन्हा वापर नक्की करून बघा.

# कॉल गर्ल म्हणून केले काम, बार डान्सरने बॉलिवूडला दिल्या ५ सुपरहिट फिल्म्स!


## आज इंडस्ट्रीतील सर्वांत सक्सेसफुल रायटर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सातवी नापास असलेल्या या महिलेने कॉल गर्ल म्हणून काम केले. आयुष्यातील सर्व जखमांना तिने कागदावर उतरवले आणि बघता-बघता ती बॉलिवूडची एक सक्सेसफुल लेखिका बनली आहे. ही लेखिका आहे शगुफ्ता रफीक.

बॉलिवूडमध्ये काही चित्रपट असे असतात, की ज्यांनी प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावले. यातील काही चित्रपट म्हणजे ‘आशिकी २’, ‘मर्डर २’ आणि ‘वो लम्हे’. या चित्रपटांप्रमाणेच त्यातील गाणीही तुफान गाजतात. पण तुम्हाला माहीत आहे का, ज्या कथांनी प्रेक्षकांना रडवले, त्या कथा एका अशा महिलेच्या लेखणीतून उतरल्या आहेत, जिने आयुष्यात फक्त अपमान आणि अंधारच पाहिला आहे.

शगुफ्ता रफीक यांचे आयुष्य एखाद्या फिल्मपेक्षा कमी नाही. शगुफ्ता यांना अनवरी बेगम यांनी दत्तक घेतले होते. आधी ज्या घरात धनधान्याच्या राशी होत्या, तिथे अचानक गरिबी आली आणि त्यांचे अक्षरशः खाण्याचे वांदे झाले होते. परिस्थिती इतकी वाईट झाली होती, की अनवरी बेगम यांना रस्त्यावर भीक मागावी लागत होती. आपल्या आईला रस्त्यावर भीक मागताना पाहून १७ वर्षांच्या शगुफ्ताचे काळीज तुटले. आईला या गरिबीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी शिक्षण सोडले आणि मुंबईच्या रेड लाइट एरियामध्ये पाऊल ठेवले. सुरूवातीला त्यांनी कॉल गर्ल म्हणून काम केले. त्यानंतर काही काळ त्यांनी दुबईमध्ये बार डान्सर म्हणून काम केले. दुबईत असताना शगुफ्ता यांना ४५ वर्षांच्या एका पाकिस्तानी व्यक्तीने लग्नाची मागणी घातली होती. त्यांनी सांगितले, की ‘आशिकी २’ मधील आरोहीच्या संघर्षाचा ३०-४० टक्के भाग हा स्वतः शगुफ्ता यांच्या आयुष्यावर बेतलेला आहे. त्यांच्यासाठी तो राहुल जयकरसारखा होता, जो त्यांच्यावर पैसे उधळायचा पण त्यांच्या कलेचा आदर करायचा. त्यानंतर शगुफ्ता यांच्या आयुष्याला खरी कलाटणी मिळाली ती २००२ मध्ये जेव्हा त्यांची भेट महेश भट्ट यांच्यासोबत झाली. शगुफ्ता यांनी आपला ‘वो लम्हे’चा अनुभव सांगताना म्हटले, की ‘ज्या दिवशी मी सिनेमा साईन केला, त्याच्या दोन दिवस आधीपर्यंत मी बारमध्ये डान्स करत होते. भट्ट साहेबांचा फोन आला तेव्हा मी त्यांना सांगितले, की मी माझी डान्सची नोकरी सोडू शकत नाही, कारण घर चालवायचे होते.’ हाच सीन पुढे आपण ‘आशिकी २’ मध्ये पाहिला आहे. शगुफ्ता आणि महेश भट्ट यांच्यात एक वेगळे नाते आहे. त्या म्हणतात, की ‘आम्ही दोघे सोलमेट आहोत. आमची जन्मतारीख एकच आहे आणि आमची कौटुंबिक पार्श्वभूमीही सारखीच आहे. समाजाच्या नजरेत आम्हाला अनैतिक मानले गेले, कदाचित म्हणूनच आमच्या वेदना एकसारख्या होत्या.’ शगुफ्ता यांनी केवळ कथा लिहिल्या नाहीत, तर त्यांनी बॉलीवूडला ब्लॉकबस्टर गाणीही दिली. त्यांनी आशिकी २, वो लम्हे, मर्डर २, जन्नत २, राज २ आणि आवारापन यांसारखे गाजलेले चित्रपट लिहिले. आज शगुफ्ता रफीक यांचे नाव सन्मानाने घेतले जाते. कॉल गर्ल ते टॉपची स्क्रीन रायटर हा त्यांचा प्रवास अनेकांना प्रेरणा देतो.



# आयएएस उमेदवारांची मुलाखत कोण घेते?

## पॅनलमध्ये किती लोक असतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयएएस होण्यासाठी लाखो तरुण तयारी करत असतात. आयएएस आणि आयपीएस झाल्यानंतर मिळणारा मान, वेतन आणि सेवा-सुविधा आश्चर्यकारक असतात. पण तुम्हाला माहिती आहे का आयएएस उमेदवारांची मुलाखत कोण घेत असते?

भारतातील सर्वात अवघड परीक्षा असलेल्या यूपीएससी संदर्भात अनेकांना आकर्षण आहे. दरवर्षी सिव्हील सेवेसाठी ८ ते १० लाख लोक अर्ज करतात. मात्र, परीक्षेसाठी बसणाऱ्यांची संख्या कमी असते. वर्ष २०२५ मध्ये यूपीएससी सीएसई २०२५ मध्ये सुमारे ९.३७ लाख उमेदवारांनी अर्ज केला होता. त्यातील ५.७७ लाख उमेदवार परीक्षेसाठी बसले. तर २०२६ मध्ये परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या ८.१९ लाख होती. मात्र, ५.४९ लाख उमेदवार परीक्षेसाठी बसले. या आकड्यांवरून सिव्हील सेवेचे आकर्षण दिसून येते. परंतु तुम्हाला माहिती आहे का आयएएसची मुलाखत कोण घेते?

ही मुलाखत यासाठी घेतली जाते की उमेदवाराच्या ज्ञानातून जास्तीत जास्त त्याची पर्सनॅलिटी, डिसिजन मेकिंग ॲबिलिटी, कम्युनिकेशन क्वालिटीज, लिडरशीप क्वालिटीज, ॲडमिनिस्ट्रेलिव्ह ॲप्टिट्यूड पाहिली जाते. जर उमेदवाराला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचा विचार केला तर तुमचा डीएएफ (डिटेल ॲप्लिकेशन फॉर्म), शिक्षण आणि कामाचा अनुभव, हॉबी आणि इंटरेस्ट, करंट अफेअर्स, सामाजिक आणि आर्थिक मुद्दे, राष्ट्रीय मुद्दे, परिस्थिती आधारित प्रश्न विचारले जातात.



### आयएएस अधिकारी मुलाखत घेतात का?

कधी-कधी मुलाखत घेणाऱ्या बोर्डात सेवानिवृत्त आयएएस, आयपीएस, आयएफएस वा अन्य वरिष्ठ अधिकारी सदस्याच्या रूपात सामील होऊ शकतात. परंतु मुलाखत कधी एका आयएएस अधिकाऱ्याद्वारा घेतली जात नाही. मुलाखत ही पाच सदस्यांच्या बोर्डाद्वारे घेतली जाते.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






आज 'भानुसप्तमी'

# चुकूनही 'ही' कामे करू नका; अन्यथा होईल नुकसान!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भानुसप्तमी हा भगवान सूर्याची उपासना करण्यासाठी अत्यंत पवित्र आणि शुभ दिवस मानला जातो. या दिवशी केलेल्या पूजेमुळे आरोग्य, कीर्ती आणि सुख-समृद्धी लाभते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. मात्र, शास्त्रांनुसार या दिवशी काही गोष्टी करणे वर्ज्य मानले गेले आहे. भानुसप्तमीला चुकूनही खालील कामे करू नयेत, अन्यथा आरोग्याचे आणि धनाचे मोठे नुकसान होऊ शकते.

**भानुसप्तमीला या गोष्टी करणे टाळा**

**तांब्याच्या वस्तू विकणे किंवा दान करणे** : तांबे धातूचा थेट संबंध सूर्यदेवाशी आहे. त्यामुळे या दिवशी तांब्याच्या वस्तू विकणे किंवा कोणालातरी दान करणे (विशेषतः मोबदला घेऊन)



अशुभ मानले जाते. यामुळे कुंडलीतील सूर्य कमजोर होऊ शकतो.

**मिठाचे सेवन** : भानुसप्तमीच्या दिवशी अन्नात मिठाचा वापर टाळावा किंवा कमीत कमी करावा. शक्य असल्यास या दिवशी अळणी (विना मिठाचे) जेवण करावे. असे केल्याने सूर्यदेवाचा आशीर्वाद मिळतो आणि आरोग्य सुधारते.

**उशिरापर्यंत झोपणे** : सूर्यदेवाच्या या विशेष दिवशी सूर्योदयापूर्वी उठणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सूर्योदयानंतर बराच वेळ झोपून राहिल्याने शरीरात नकारात्मक ऊर्जा वाढते आणि 'सूर्य दोष' लागतो, ज्यामुळे कामात अडथळे येतात.

**घरात किंवा शरीरावर घाण ठेवणे** : सूर्यदेव हे स्वच्छतेचे प्रतीक आहेत. या दिवशी घर अस्वच्छ ठेवणे, नखे किंवा केस कापणे आणि मळके कपडे घालणे टाळावे. यामुळे घरात दारिद्र्य येऊ शकते.

**वादविवाद आणि अपशब्दांचा वापर** : या दिवशी कोणावरही रागावू नका, वाद घालू नका किंवा कुणाचा अपमान करू नका. विशेषतः वडील, गुरू किंवा ज्येष्ठ व्यक्तींचा अपमान केल्यास सूर्यदेव कोपतात. कारण सूर्य हे पितृत्वाचे कारक आहेत.

**मांसाहार आणि मद्यपान** : भानुसप्तमीला पूर्णपणे सात्विक आहार घ्यावा. या दिवशी चुकूनही तामसी भोजन (मांसाहार, कांदा, लसूण) किंवा मद्यपान करू नये. यामुळे जीवनात आर्थिक संकट ओढवू शकते.

**या दिवशी काय करावे?**

**अर्घ्य देणे** : सकाळी सूर्योदयाच्या वेळी तांब्याच्या कलशात शुद्ध पाणी, अक्षता, लाल फूल आणि कुंकू टाकून सूर्यदेवाला अर्घ्य द्यावे.
**मंत्रांचा जप** : अर्घ्य देताना ॐ सूर्याय नमः किंवा गायत्री मंत्राचा जप करणे अत्यंत फलदायी ठरते.
**दान** : या दिवशी गरजू लोकांना गहू, गूळ किंवा लाल कपडे दान करणे अत्यंत शुभ मानले जाते.



# अधिक मासात 'गोग्रास' भरविण्याला विशेष महत्त्व

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू धर्मात 'अधिक मास' (धोंड्याचा महिना) हा अत्यंत पवित्र आणि पुरुषोत्तम मास म्हणून ओळखला जातो. या महिन्यात केलेले नामस्मरण, दान आणि पुण्याचे फळ इतर महिन्यांपेक्षा अनंत पटींनी अधिक मिळते. अधिक मासात 'गोग्रास' देण्याला म्हणजेच गायीला नैवेद्य किंवा घास भरविण्याला विशेष महत्त्व आहे.

**गोग्रास म्हणजे काय?**

आपल्या घरात रोज जेवण तयार झाल्यावर देवाच्या नैवेद्यासोबतच पहिली भाकरी किंवा पोळी (काही ठिकाणी गोड घास) गायीसाठी बाजूला काढली जाते, त्याला 'गोग्रास' म्हणतात. अधिक मासात दररोज किंवा जमल्यास ठराविक दिवशी गायीला मनोभावे घास भरविला जातो.

**अधिक मासात गोग्रास देण्याचे महत्त्व**

**३३ कोटी देवांचे आशीर्वाद** : हिंदू धर्मानुसार गायीच्या शरीरात ३३ कोटी देवदेवतांचा वास असतो. अधिक मासात गायीला ग्रास भरविल्याने सर्व देवतांचे एकाच वेळी पूजन केल्याचे पुण्य लाभते.

**श्री विष्णूंची कृपा** : अधिक मासाचे स्वामी भगवान पुरुषोत्तम (श्री विष्णू) आहेत. गाय ही भगवान श्रीकृष्णांना (विष्णू अवतार) अत्यंत प्रिय आहे. त्यामुळे गायीची सेवा केल्याने श्री विष्णू प्रसन्न होतात आणि कृपाशीर्वाद देतात.

**पितृदोषातून मुक्ती** : अधिक मासात गायीला चारा किंवा गोग्रास दिल्याने पितर तृप्त होतात आणि कुटुंबाला लागलेला पितृदोष दूर होतो, अशी धार्मिक श्रद्धा आहे.
**पुण्याची अनंत पटीने वाढ** : या पवित्र महिन्यात केलेल्या छोट्याशा दानाचेही महापुण्यात रूपांतर होते. गोग्रास दिल्याने घरातील दारिद्र्य दूर होऊन सुख-समृद्धी नांदते.

**गोग्रास कसा द्यावा?**

१) शक्यतो ताजी पोळी, गूळ किंवा हिरवा चारा गायीला द्यावा.

२) गोग्रास देताना गायीच्या पाठीवर (कुबडावर) मायेने हात फिरवून नमस्कार करावा.

३) मनात 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' किंवा 'गोमाता की जय'चा जप करावा.

'गावो विश्वस्य मातरः' अर्थात गाय ही विश्वाची माता आहे. अधिक मासात गोमातेची सेवा करून आपल्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी आणूया..!

# कालगणना, धर्मशास्त्र आणि अध्यात्म यांचा अद्वितीय संगम

## अधिक मास आणि सूर्योपासना

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय संस्कृतीत सूर्य हा केवळ प्रकाश आणि उर्जेचा स्रोत नसून कालचक्राचा अधिपती मानला जातो. वेद, पुराणे, ज्योतिषशास्त्र आणि धर्मशास्त्र या सर्वच परंपरांमध्ये सूर्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. दुसरीकडे 'अधिक मास' किंवा 'पुरुषोत्तम मास' हा हिंदू कालगणनेतील एक विशेष महिना मानला जातो. अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो, की अधिक मास आणि सूर्य यांचा नेमका संबंध काय आहे? अधिक मास हा चंद्राच्या गणनेवर आधारित असताना त्याचा सूर्याशी संबंध कसा जोडला जातो? धर्मशास्त्राच्या दृष्टीने त्याचे महत्त्व काय आहे? या प्रश्नांची उत्तरे भारतीय कालगणना, ज्योतिष आणि अध्यात्म यांच्या अभ्यासातून मिळतात.

**भारतीय कालगणनेचा पाया**

भारतीय पंचांग हे 'चांद्र-सौर' पद्धतीवर आधारित आहे. म्हणजेच त्यात चंद्राच्या कलांचा आणि सूर्याच्या गतीचा दोन्हीचा विचार केला जातो. चांद्रमास साधारणपणे २९.५ दिवसांचा असतो. त्यामुळे बारा चांद्रमासांचे वर्ष सुमारे ३५४ दिवसांचे होते. परंतु सूर्यवर्ष सुमारे ३६५ दिवसांचे असते. अशा प्रकारे दरवर्षी सुमारे ११ दिवसांचा फरक निर्माण होतो. हा फरक वाढत गेला तर ऋतू, सण आणि धार्मिक उत्सव यांचे कालमान विस्कळीत होईल. उदा.- वसंत ऋतूतील सण कधी हिवाळ्यात तर कधी उन्हाळ्यात येऊ लागतील. याच विसंगतीचे निराकरण करण्यासाठी भारतीय ऋषींनी 'अधिक मास' ही संकल्पना विकसित केली.

**अधिक मास कसा ठरतो?**

हिंदू ज्योतिषानुसार सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो, त्याला 'संक्रांत' असे म्हणतात. सामान्यतः प्रत्येक चांद्रमासात एक संक्रांत येते. परंतु कधी-कधी असा चांद्रमास येतो की त्या संपूर्ण महिन्यात सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करत नाही. म्हणजेच त्या महिन्यात एकही संक्रांत होत नाही. अशा महिन्याला 'अधिक मास' म्हणतात. यावरून स्पष्ट होते, की अधिक मासाचा निर्णय चंद्रमासावर आधारित असला तरी त्याचे अस्तित्व आणि ओळख सूर्याच्या राशी परिवर्तनाशी थेट संबंधित आहे. म्हणजेच सूर्याच्या गतीशिवाय अधिक मास निश्चितच होऊ शकत नाही.

**सूर्य : कालचक्राचा अधिपती**



धर्मशास्त्रात सूर्याला 'कालस्वरूप' मानले आहे. श्रीमद्भगवद्गीते मध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, की सृष्टीतील सर्व कालचक्र माझ्या अधीन आहे. वैदिक परंपरेत सूर्य हा दिवस, ऋतू, अयन आणि वर्ष यांचा नियंता मानला गेला आहे. सूर्याशिवाय कालगणना अशक्य आहे. म्हणूनच अधिक मास हा प्रत्यक्षात चंद्र आणि सूर्य यांच्या गतीमधील संतुलन प्रस्थापित करण्याचा धार्मिक आणि वैज्ञानिक प्रयत्न आहे.

**धर्मशास्त्रातील अधिक मासाचे महत्त्व**

धर्मशास्त्रानुसार अधिक मास हा इतर महिन्यांप्रमाणे सामान्य नसून विशेष साधनेसाठी राखून ठेवलेला कालखंड आहे. काही स्मृतिग्रंथ आणि पुराणांमध्ये या महिन्याला प्रारंभी 'मलमास' म्हटले गेले. कारण या महिन्यात कोणतीही संक्रांत नसल्याने त्याला स्वतंत्र देवता नव्हती. पुराणकथेनुसार हा महिना भगवान विष्णूंकडे गेला आणि आपल्या उपेक्षित अवस्थेची व्यथा व्यक्त केली. तेव्हा भगवान विष्णूंनी त्याला स्वतःचे नाव दिले. तेव्हापासून तो 'पुरुषोत्तम मास' म्हणून पूजनीय मानला जाऊ लागला.
विशेषतः स्कंदपुराण, पद्मपुराण आणि नारद पुराण यामध्ये अधिक मासाचे मोठे महात्म्य वर्णिले आहे.

**सूर्य आणि पुरुषोत्तम मास यांचे आध्यात्मिक नाते**

अध्यात्माच्या दृष्टीने सूर्य हा बाह्य प्रकाशाचा नव्हे, तर अंतर्मनातील ज्ञानप्रकाशाचाही प्रतीक आहे. अधिक मासात मोठे सांसारिक समारंभ, विवाह, गृहप्रवेश यांसारखी मंगलकार्ये सामान्यतः टाळली जातात. त्यामुळे व्यक्तीला आत्मपरीक्षण, जप, तप, दान, व्रत, स्वाध्याय आणि ईश्वरचिंतनासाठी अधिक वेळ मिळतो. धर्मशास्त्रकारांच्या मते हे प्रतीकात्मक आहे. जसे सूर्य जगाला प्रकाश देतो, तसेच अधिकमास मनुष्याला अंतर्मुख होऊन आत्मज्ञानाचा प्रकाश प्राप्त करण्याची संधी देतो. म्हणूनच अनेक संतांनी अधिक मासाला 'आत्मशुद्धीचा महिना' असे संबोधले आहे.

**अधिक मासात सूर्योपासनेचे महत्त्व**

धर्मशास्त्रात अधिक मासात सूर्योपासना विशेष फलदायी मानली जाते. यामध्ये पुढील साधनांचा उल्लेख आढळतो. सूर्योदयकाळी अर्घ्यदान, आदित्यहृदय स्तोत्र पठण, गायत्री मंत्र जप, सूर्यनमस्कार, रविवारी उपवास, अन्नदान व वस्त्रदान. आदित्यहृदयममध्ये सूर्याला सर्व देवतांचे स्वरूप मानले आहे. त्यामुळे अधिक मासातील सूर्यपूजा ही प्रत्यक्षात विश्वसनीयता परमात्म्याच्या उपासनेचे रूप मानली जाते.

**अधिक मास : विज्ञान आणि अध्यात्म यांचा संगम**

अधिक मासाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यात विज्ञान आणि अध्यात्म यांचा सुंदर मिलाफ दिसतो. एका बाजूला सूर्यवर्ष आणि चांद्रवर्ष यांतील गणितीय फरक भरून काढण्यासाठी ही व्यवस्था निर्माण झाली. दुसऱ्या बाजूला त्याच कालखंडाला आत्मिक उन्नतीसाठी विशेष महत्त्व देण्यात आले. जगातील अनेक संस्कृतींमध्ये अधिवर्ष आढळते; परंतु कालगणनेतील दुरुस्तीला धार्मिक साधना, व्रत आणि आध्यात्मिक चिंतनाशी जोडण्याची परंपरा भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. अधिक मास आणि सूर्य यांचा संबंध केवळ ज्योतिषशास्त्रीय नाही, तर अत्यंत गहन आध्यात्मिक स्वरूपाचा आहे. अधिक मासाची निर्मिती सूर्याच्या राशी परिवर्तनाशी निगडित आहे. सूर्य हा कालाचा अधिपती असल्याने त्याच्या गतीशी सुसंगती राखण्यासाठी अधिक मासाची योजना करण्यात आली. धर्मशास्त्राने या कालखंडाला आत्मचिंतन, उपासना, दान आणि साधनेसाठी सर्वोत्तम मानले आहे. म्हणूनच अधिक मास हा केवळ पंचांगातील अतिरिक्त महिना नसून, सूर्याच्या कालचक्राशी सुसंगत राहून मनुष्याने आपल्या जीवनात आध्यात्मिक प्रकाश निर्माण करण्याची एक दुर्मिळ संधी आहे. भारतीय परंपरेतील ही संकल्पना कालगणनेतील अचूकता आणि आत्मोन्नती यांचा अद्वितीय संगम म्हणून आजही तितकीच महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी ठरते.

# अधिक मासातील ३३ अनारशांचे रहस्य

## जावयाला का दिले जाते जाळीदार वाण?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अधिक मासाला धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे. हा महिना पूजा, जप, दानधर्म, व्रत आणि आत्मचिंतनासाठी शुभ मानला जातो. या काळात केलेले दान आणि सत्कर्म अधिक पुण्यदायी मानले जाते. त्यामुळे अनेक घरांमध्ये विविध धार्मिक परंपरा आणि कौटुंबिक रीतीरिवाज पाळले जातात.

**अधिक मास म्हणजे काय?**

अधिक मास हा हिंदू पंचांगातील एक विशेष महिना मानला जातो. साधारणपणे दर ३२ ते ३३ महिन्यांनी हा महिना येतो. सूर्याच्या वर्षात ३६५



दिवस असतात, तर चंद्राच्या वर्षात सुमारे ३५४ दिवस असतात. या दोन्ही वर्षांमध्ये सुमारे ११ दिवसांचा फरक पडतो. हा फरक भरून काढण्यासाठी पंचांगात एक अतिरिक्त महिना जोडला जातो, त्यालाच 'अधिक मास' असे म्हणतात.

**लेक-जावयाला वाण**

याच अधिक मासात लेक-जावयाला वाण देण्याची खास परंपरा महाराष्ट्रात पाहायला मिळते. मुलगी आणि जावई यांना घरी बोलावून त्यांचा सन्मान केला जातो. त्यांना कपडे, मिठाई, फळे किंवा खास जाळीदार पदार्थ भेट म्हणून दिले जातात. या वाणामध्ये विशेषतः अनारसे, मैसूर पाक किंवा बत्तासे देण्याची पद्धत आहे. अनेक ठिकाणी चांदीच्या ताटात ३३ अनारसे देण्याची प्रथा देखील पाळली जाते.

**जाळीदार वाण का देतात?**

जाळीदार वाण देण्यामागे एक सुंदर प्रतीकात्मक अर्थ सांगितला जातो. जाळीतील अनेक छिद्रे ही माणसाच्या स्वभावातील दोष आणि नकारात्मक विचारांचे प्रतीक मानली जातात. असे वाण दान केल्याने नकारात्मकता दूर होते आणि जीवनात आनंद, समृद्धी आणि सकारात्मकता येते, अशी श्रद्धा आहे. तसेच जशी जाळीतून हवा सहजपणे आरपार जाते, तशीच नात्यांमध्ये मोकळेपणा आणि पारदर्शकता असावी, गैरसमज राहू नयेत, हा संदेशही या परंपरेतून दिला जातो. त्यामुळे अधिक मास हा केवळ धार्मिक महिना नसून नाती अधिक घट्ट करणारा आणि आपुलकी वाढवणारा काळ मानला जातो.

# रघुराज थक्कीत होऊनि पाहे...

## मना सज्जना...

परम स्नेही मित्र हो,

मनाचे श्लोक समजून घेताना आपण त्यातील शब्दांचे लौकिक अर्थ पाहतो. तसे त्यांचे मतितार्थ आणि रचनेच्या अनुषंगाने होणारे गूढ अर्थ समजून घेतले पाहिजे. बऱ्याचदा एखादा शब्द अनेक अर्थांच्या छटा घेऊन येतो. ते पाहणे मोठे मनोरंजक असते. असेच काही शब्द पुढील श्लोकात आले आहेत.

**मना प्रार्थना तुजला एक आहे ।**
**रघुराज थक्कीत होऊनि पाहे ।**
**अवज्ञा कदा हो यदर्थी न की जे ।**
**मना सजन्ना राघवी वस्ती कीजे ॥ ३८ ॥**

इथे समर्थ मनाला सूचना किंवा आदेश देत नाहीत तर मनाला प्रार्थना करताहेत. मनाच्या चंचल स्वभावाला स्थिर कसे करावे? हा प्रश्न त्यांना पडलेला असावा. ते मनाला प्रभू श्रीरामचंद्रांकडे 'थक्कीत' होऊन पाहायला सांगताहेत. इथे समर्थ 'थक्कीत' शब्द योजतात.
समर्थ एखादा शब्द सहज वापरत नाहीत. प्रत्येक शब्दामागे अनुभव, चिंतन आणि साधनेची गहन पार्श्वभूमी असते. या श्लोकातील 'थक्कीत' हा असाच एक शब्द आहे. आश्चर्य, आदर, प्रेम, भक्ती आणि आत्मसमर्पण या सर्व भावनांचा एकत्रित संगम या एका शब्दात दडलेला दिसतो.
याचा अर्थ प्रभू श्रीरामचंद्र यांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व, त्याचा प्रभाव, पराक्रम यासोबतच त्यांचे अभयमुद्रा असलेले भक्तवत्सल स्वरूप सतत डोळ्यांसमोर आणावे आणि आश्चर्ययुक्त मनाने थक्क व्हावे, असा घ्यावा लागेल.

वाल्मिकी रामायणात, तसेच तुलसीदास यांच्या काव्यात प्रभू श्रीरामचंद्रांच्या विलोभनीय रूपाचे अनेक ठिकाणी वर्णन आले आहे. विशेषतः बालकांड आणि अरण्यकांडमध्ये प्रभू श्रीरामचंद्रांचे शारीरिक सौंदर्य, तेज, व्यक्तिमत्त्व आणि राजलक्षणे यांचे वर्णन सविस्तर केले आहे. ते मुळातच वाचण्यासारखे आहे. काही संस्कृत श्लोक आणि त्यातील वर्णन आपण पाहूया.

**श्रीराम : कमलपत्राक्षः पूर्णचन्द्रनिभाननः।**
**रूपदाक्षिण्यसम्पन्नः प्रसूत इव मन्मथः॥**

**अर्थ :** प्रभू श्रीरामचंद्रांचे नेत्र कमळाच्या पाकळ्यांसारखे सुंदर होते. त्यांचा मुखमंडल पूर्ण चंद्राप्रमाणे तेजस्वी होते. सौंदर्य, विनय आणि माधुर्य यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. जणू मन्मथ म्हणजे कामदेवच अवतरला आहे, असे त्यांचे रूप होते.
प्रभू श्रीरामचंद्रांच्या शरीरयष्टीचे वर्णन बघा किती रंजक आहे.

**विपुलांसो महाबाहुः कम्बुग्रीवो महाहनुः।**
**महोरस्को महेष्वासो गूढजत्रुररिन्दमः॥**

**अर्थ :**
प्रभू श्रीरामचंद्रांचे रुंद आणि बलशाली खांदे आहेत. गुडघ्यांपर्यंत पोहोचणारे लांब बाहू (आजानुबाहू) आहेत. शंखासारखी सुंदर मान आहे. भव्य हनुवटी, विशाल छाती आहे. उत्तम धनुर्धर, शत्रूंचा पराभव करणारा वीर आहे.

आणखी एक वर्णन आहे.



**आजानुबाहुः सुशिराः सुललाटः सुविक्रमः।**
**समः समविभक्ताङ्गः स्निग्धवर्णः प्रतापवान्॥**

**अर्थ :**
गुडघ्यांपर्यंत पोहोचणारे हात, भव्य सुंदर मस्तक, रुंद कपाळ, शरीराचे सर्व अवयव प्रमाणबद्ध. श्यामल, स्निग्ध कांती, तेजस्वी आणि प्रभावशाली व्यक्तिमत्त्व.

थोडक्यात वाल्मिकींच्या दृष्टीने प्रभू श्रीरामचंद्र हे केवळ दिसायला सुंदर पुरुष नव्हते; त्यांच्या रूपात सौंदर्य, सामर्थ्य, तेज, करुणा, शौर्य, पराक्रम आणि मर्यादा या गुणांचा अद्वितीय संगम होता.
मराठी संतपरंपरेत याच भावनेने प्रभू श्रीरामचंद्रांचे वर्णन केलेले आहे.
"श्यामल कोमल रामरूप,
पाहता लोचनी सुख झाले."

प्रभू श्रीरामचंद्रांचे सौंदर्य हे केवळ बाह्य रूपाचे नव्हे, तर प्रभू श्रीरामचंद्रांचे वर्णन करताना रूप आणि गुण यांची सांगड नेहमीच घातलेली दिसते. अशा प्रभू श्रीरामचंद्रांचे देखणे रूप सदैव आपल्यासमोर ठेवावे.
पुढे ते मनाला बजावताहेत.
अवज्ञा कदा यदर्थी न कीजे...
म्हणजे प्रभू श्रीरामचंद्रांच्या नामाचे विस्मरण आपल्याला कदापिही होणार नाही याची मनाने दक्षता घ्यावी. आज्ञेचे उल्लंघन होईल अशा स्वरूपाचे वर्तन आपल्या हातून कधीही घडू नये यासाठी समर्थ म्हणतात,

'मना सज्जना राघवी वस्ती कीजे...'

मनात सदैव प्रभू श्रीराम वसावा म्हणून त्यांचे नामस्मरण चिंतन करावे. ध्यान धरावे. प्रभू श्रीरामांचे ठायी आपले स्व स्वरूप विलीन करून घ्यावे म्हणजे मनाला स्थिरता प्राप्त होते. उठता-बसता, रोजचे व्यवहार करताना कदापिही प्रभू श्रीरामचंद्रांच्या नामाचा अनादर होईल, असे वर्तन आपले नसावे.

वाल्मिकींच्या रामायणात प्रभू श्रीरामचंद्रांचे व्यक्तिमत्त्व नेत्र, वक्षस्थळ, बाहू, चाल आणि वर्ण यांच्या तपशिलातून उभे राहते. तर समर्थ रामदासांच्या लेखणीत मात्र प्रभू श्रीरामचंद्रांचे सौंदर्य त्याच्या गुणांतून प्रकट होते. घनश्याम वर्ण, कोदंडधारी मुद्रा, तेजस्वी मुख आणि करुणामय नेत्र यामागे समर्थांना धर्मासाठी उभा राहणारा, सज्जनांचे रक्षण करणारा आणि भक्तांचा कैवारी असणारा पुरुषोत्तम दिसतो. म्हणूनच समर्थांचा प्रभू श्रीरामचंद्र हा केवळ पाहण्याचा विषय नसून आचरणात उतरवण्याचा आदर्श ठरतो. तोच आपण आचरणात आणण्याचा संकल्प करूया.

**जय जय रघुवीर समर्थ!**

**भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : ९४२०३ ८९५४१**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)